REVIEW OF RESEARCH

# विदर्भातील कुणबी समाजाच्या विद्यार्थ्यांच्या समस्या अध्ययन सवयी व त्यांचे शैक्षणिक संपादन एक सहसंबंधात्मक अध्ययन

सुहासबाबु अनिलबाबु फुंडे[१], डॉ. के. एम. भांडारकर[२]

[१]संशोधक , बी.ए.,बी.कॉम.,बी.एड्.एम.एड्.
[२]मार्गदर्शक , एम.एस्सी., एम.एड्., पीएच.डी.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



## सारांश

प्रस्तुत संशोधनाकरीता विदर्भातील कुणबी समाजातील उच्च माध्यमिक स्तरावरील सर्व विद्यार्थ्यांचा अंर्तभाव जनसंख्येत करण्यात आला आहे. तर याद्रुच्छिक पध्दतीद्वारे विदर्भातील एकुण ११ जिल्हयापैकी १० जिल्हयामधून १० शहरी व १० ग्रामीण भागामधील एकुण २० विद्यालयाची निवड करण्यात येईल व या २० विद्यालयामधून प्रत्येकी १०० विद्यार्थी या प्रमाणे २००० विद्यार्थ्यांची समस्या व शैक्षणिक प्रगती जाणून घेण्याकरीता त्यांची निवड याद्रुच्छिक पद्धतीने (Random Sampling Method) करण्यात आली

## प्रास्ताविक

भारतात विविध धर्माचे विविध पंथाचे आणि विविध जातीचे लोक राहतात. त्यांच्या पैकी एक जमात म्हणजे कुणबी जमात होय. ह्या जमातीचा स्वतंत्र असा इतिहास आहे. महाराष्ट्रातील विशेषत: खेडयामध्ये वास्तव्य करित असलेला शेतीचा व्यवसाय करणारा व ज्याचा आधूनिक जगाशी फार कमी संबंध असलेला समाज म्हणजे कुणबी समाज होय.

मानव जन्माला आल्यावर तो कोणते तरी नाव, धर्म, जात किंवा कुळ इत्यादी बंधनात अडकलेला असतो. समाजाचा किंवा जातीचा घटक या नात्याने त्या समाजाचे काहीतरी देणे-घेणे किंवा ऋण त्याचावर असते. हे ऋण त्याला त्याच जन्मात फेडावे लागते. म्हणजेच समाजातील एखादा व्यक्ती शिक्षित होऊन समाजाला नवी दिशा दाखवू शकते, म्हणून शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे जी मानवाचा विकासाबरोबर समाजाचाही विकास घडवून आणते.

भारत सरकारने अनेक शिक्षणाचे कायदे केले त्यात प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा अधिकार देण्यात आला व प्रत्येकाला शिक्षित करण्याचे बंधनकारक केले. परंतू आजही आपल्याला काही ठिकाणी पुर्णपणे शिक्षण पोहचल्याचे दिसत नाही. त्यामुळे अजुनही बऱ्याचशा निरक्षर लोकांची संख्या आढळून येते त्याच्यात कुणबी समाजाचा समावेश आपल्याला दिसतो. त्यांच्या शेती या व्यवसायामुळे शिक्षणाकडे त्यांच्याकडून लक्ष दिल्या गेले नाही.

'शिक्षण म्हणजे व्यक्तीचा शारिरीक, मानसिक, आणि नैतिक विकास'. ही शिक्षणाची व्याख्या आज सर्वांना मान्य झाली आहे. म्हणजेच त्याला स्वत:चा व समाजाची उन्नती करण्या लायक बनविणे म्हणजेच शिक्षण. शिक्षण ही जन्म मृत्यू पर्यंत किंवा विशिष्ट अवस्थेपूरती मर्यादीत नाही. शाळेप्रमाणे मनुष्य हा घरी दारी व्यवहारात समाजात आणि जीवनात शिकतच असतो. जीवन हा शिक्षणाचा विषय आहे, आणि व्यक्ती व समाज परस्पर संबंधीत आहे. आणि शिक्षणाने ह्या दोघांचेही हित साधायचे असते. 'शिक्षण म्हणजे संस्कार' परंतू ही संस्कार प्रक्रिया केवळ ज्ञानात्मक अंगापूरती मर्यादीत राहता कामा नये. त्यात भावनात्मक व क्रियात्मक बाजुंचाही समावेश असायला हवा. अशाप्रकारे शिक्षणाची व्यापकता संपूर्ण विश्वात अखंड आहे.

**सारणी क्रमांक १: विदर्भातील कुणबी समाजातील शहरी उच्च माध्यमिक विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या शैक्षणीक संपादनासंबंधी माहिती**

| शैक्षणिक संपादन | शहरी मुले | | शहरी मुली | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| अति उत्कृष्ट | ४२ | ८.४ | ६५ | १३.० |
| उत्कृष्ट | १४७ | २९.४ | १६५ | ३३.० |
| समाधानकारक | २७९ | ५५.८ | २५७ | ५१.४ |
| असमाधानकारक | ३० | ६.० | १० | २.० |
| अत्यंत असमाधानकारक | २ | ०.४ | ३ | ०.६ |
| एकुण | ५०० | १०० | ५०० | १०० |
| **Mean** | **2.606** | | **2.442** | |
| **SD** | **0.681** | | **0.641** | |
| **Z** | **3.921** | | | |
| **P** | **0.0001(<0.05)** | | | |

Mean– मध्यमान; SD – Standard Deviation मानक विचलन; Z – Z मूल्य; P – P मूल्य (सार्थकता); NS – Non Significant महत्वपूर्ण फरक नाही

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये विदर्भातील कुणबी समाजातील शहरी उच्च माध्यमिक विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या शैक्षणीक संपादनासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार विदर्भाच्या शहरी भागातील ५५.८ टक्के कुणबी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन समाधानकारक स्वरूपाचे असून २९.४ टक्के कुणबी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन उत्तम स्वरूपाचे असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे शैक्षणिक संपादनाचे स्वरूप अति उत्तम, असमाधानकारक व अत्यंत असमाधानकारक असणाऱ्या शहरी भागातील कुणबी विद्यार्थ्यांची टक्केवारी क्रमशः ८.४ टक्के, ६.० टक्के व ०.४ टक्के असल्याचे दिसून आले.

शहरी भागातील ५१.४ टक्के कुणबी विद्यार्थिनींचे शैक्षणिक संपादन समाधानकारक स्वरूपाचे असून ३३.० टक्के कुणबी विद्यार्थिनींचे शैक्षणिक संपादन उत्तम स्वरूपाचे असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे शैक्षणिक संपादनाचे स्वरूप अति उत्तम, असमाधानकारक व अत्यंत असमाधानकारक असणाऱ्या शहरी भागातील कुणबी विद्यार्थिनींची टक्केवारी क्रमशः १३.० टक्के, २.० टक्के व ०.६ टक्के असल्याचे दिसून आले.

उपरोक्त माहितीवरून असे निदर्शनास येते की, विदर्भाच्या शहरी भागातील उच्च माध्यमिक स्तरावरील बहुतांश कुणबी विद्यार्थी व विद्यार्थिनींचे शैक्षणिक संपादन समाधानकारक स्वरूपाचे आहे. तथापी शैक्षणिक संपादनासंदर्भात शहरी विदर्भातील कुणबी विद्यार्थी व विद्यार्थिनींदरम्यान सार्थक ($Z = 3.921$; $P<0.05$) अंतर असल्याचे निदर्शनास येते.

### ग्रामीण विद्यार्थी व विद्यार्थिनींचे शैक्षणिक संपादन

**सारणी क्रमांक १: विदर्भातील ग्रामीण कुणबी समाजातील उच्च माध्यमिक विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या शैक्षणीक संपादनासंबंधी माहिती**

| शैक्षणिक संपादन | ग्रामीण मुले | | ग्रामीण मुली | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| अति उत्कृष्ट | ३६ | ७.२ | ५६ | ११.२ |
| उत्कृष्ट | ११४ | २२.८ | १६८ | ३३.६ |
| समाधानकारक | २७१ | ५४.२ | २३२ | ४६.४ |
| असमाधानकारक | ६१ | १२.२ | ३७ | ७.४ |
| अत्यंत असमाधानकारक | १८ | ३.६ | ७ | १.४ |
| एकुण | ५०० | १०० | ५०० | १०० |
| **Mean** | **2.822** | | **2.542** | |

| | | |
|---|---|---|
| SD | 0.619 | 0.548 |
| Z | 7.573 | |
| P | 0.000(<0.05) | |

Mean– मध्यमान; SD – Standard Deviation मानक विचलन; Z – Z मूल्य; P – P मूल्य (सार्थकता); NS – Non Significant महत्वपूर्ण फरक नाही

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये विदर्भातील ग्रामीण कुणबी समाजातील उच्च माध्यमिक विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या शैक्षणीक संपादनासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार विदर्भाच्या ग्रामीण भागातील ५४.२ टक्के कुणबी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन समाधानकारक स्वरूपाचे असून २२.८ टक्के कुणबी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन उत्तम स्वरूपाचे असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे शैक्षणिक संपादनाचे स्वरूप अति उत्तम, असमाधानकारक व अत्यंत असमाधानकारक असणाऱ्या ग्रामीण भागातील कुणबी विद्यार्थ्यांची टक्केवारी क्रमश: ७.२ टक्के, १२.२ टक्के व ३.६ टक्के असल्याचे दिसून आले.

ग्रामीण भागातील ४६.४ टक्के कुणबी विद्यार्थिनींचे शैक्षणिक संपादन समाधानकारक स्वरूपाचे असून ३३.६ टक्के कुणबी विद्यार्थिनींचे शैक्षणिक संपादन उत्तम स्वरूपाचे असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे शैक्षणिक संपादनाचे स्वरूप अति उत्तम, असमाधानकारक व अत्यंत असमाधानकारक असणाऱ्या ग्रामीण भागातील कुणबी विद्यार्थिनींची टक्केवारी क्रमश: ११.२ टक्के, ७.४ टक्के व १.४ टक्के असल्याचे दिसून आले.

उपरोक्त माहितीवरून असे निदर्शनास येते की, विदर्भाच्या ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक स्तरावरील बहुतांश कुणबी विद्यार्थी व विद्यार्थिनींचे शैक्षणिक संपादन समाधानकारक स्वरूपाचे आहे. तथापी शैक्षणिक संपादनासंदर्भात ग्रामीण विदर्भातील कुणबी विद्यार्थी व विद्यार्थिनींदरम्यान सार्थक ($Z = 7.573; P<0.05$) अंतर असल्याचे निदर्शनास येते.

## निष्कर्ष

- विदर्भाच्या शहरी भागातील उच्च माध्यमिक स्तरावरील बहुतांश कुणबी विद्यार्थी व विद्यार्थिनींचे शैक्षणिक संपादन समाधानकारक स्वरूपाचे आहे.
- विदर्भाच्या ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक स्तरावरील बहुतांश कुणबी विद्यार्थी व विद्यार्थिनींचे शैक्षणिक संपादन समाधानकारक स्वरूपाचे आहे.
- विदर्भातील कुणबी समाजातील उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांचे राहते क्षेत्र (शहरी व ग्रामीण) आणि त्यांच्या सामाजिक समस्या; आर्थिक समस्या; कौटुंबिक समस्या; अध्ययन सवयी व शालेय संपादन या घटकांदरम्यान महत्वपूर्ण धनात्मक सहसंबंध आहे.

## संदर्भ ग्रंथसूची


१) आगलावे, प. (२000), 'संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे' विद्या प्रकाशन नागपूर.
२) बापट बी. ज. (१९९५), 'शैक्षणिक संशोधन', नुतन प्रकाशन पुणे.
३) बरोदे, (१९९५)'समाजशास्त्रिय संशोधनाची तत्वे व पद्धती' मंगेश प्रकाशन नागपूर.
४) बोधनकर स. आणि अलोनी व. (१९९४) 'सामाजिक संशोधन पद्धती' श्री. संत प्रकाशन नागपूर.
५) भांडारकर पु. ल., 'समाजशास्त्रीय सिध्दांत', प्रकाशक– महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मीती मंडळ, नागपूर, द्वितीय आवृती १९८६, पृष्ठ क्रंमाक २४० ते २४७
६) कोलारकर, श. गो.,''मराठयांच्या इतिहास'', प्रकाशन – श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पाचवी आवृती २00३, पृष्ठ क्रंमाक १ ते ६
७) कुंडले, एम.बी, (१९७९), 'शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र' विद्या प्रकाशन प ुणे.
८) पाटील लीला., (१९८९), 'आजचे शिक्षण आजच्या समस्या', विद्या प्रकाशन पुणे.
९) पारसनिस न. र.ए(१९९४), 'शिक्षणाची तात्वीक व सामाजशास्त्रीय भूमिका' द्वितीय आवृत्ती, नुतन प्रकाशन पुणे.

१०) घाटोले र. न.,(१९८९), 'समाजशास्त्रीय संशोधन पद्धती व तत्वे' मंगेश प्रकाशन नागपूर.
११) मुळे र. स., आणि उमठे, (१९९८), 'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे', विद्या पुस्तकालय औरंगाबाद.

LBP PUBLICATION